ePaper


ठाण्यात थरार! 12 टन गूळ, 15 फूट उंच पूल; कंटेनरने दिली धडक




वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज™

WWW.MAHAENEWS.COM | शनिवार, दि. 04 जुलै 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!




पान 3 वरुन...

पोलीस मुख्यालयाच्या प्रस्तावाला खासदार बारणे यांचा आक्षेप

## भेसळ करणाऱ्यांची आता खैर नाही; कडक कारवाई होणार

# तुकाराम मुंढे 'ऑन ॲक्शन मोड!'

महाईन्यूज । मुंबई

**राज्यात दूध व दुग्धजन्य पदार्थांतील भेसळ रोखण्यासाठी अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) मोठी मोहीम सुरू केली आहे. दूध उत्पादकापासून ते किरकोळ विक्रेत्यांपर्यंत संपूर्ण पुरवठा साखळीवर आता कडक नियम लागू करण्यात आले असून, नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाईचा इशारा अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी दिला आहे.**






याचबरोबर, 'एनर्जी ड्रिंक' हा शब्द वापरणाऱ्या स्टिंग, रेड बुल, पेप्सिकोसह १० ते १२ कंपन्यांना नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. अन्न सुरक्षा कायद्यात 'एनर्जी ड्रिंक' असा स्वतंत्र प्रकार नसल्याने उत्पादनांवर असा उल्लेख करता येणार नसल्याचे एफडीएने स्पष्ट केले आहे.

मुंढे यांनी सांगितले की, 'फार्म टू प्लेट' संकल्पनेनुसार दूध उत्पादन, संकलन, शीतकरण, प्रक्रिया, पॅकिंग, वाहतूक, वितरण आणि विक्री या संपूर्ण साखळीतील सर्व घटकांना नव्या नियमांचे पालन करावे लागणार आहे. दूध संकलन केंद्र, दुग्ध प्रक्रिया उद्योग, वितरक, घाऊक व किरकोळ विक्रेते तसेच पनीर, तूप, लोणी, दही, चीज, आईस्क्रीम आणि इतर दुग्धजन्य पदार्थ उत्पादकांनाही हे नियम लागू राहतील.

दरम्यान, शाळांच्या ५०० मीटर परिसरात एनर्जी ड्रिंक्ससह कोणत्या वस्तूंची विक्री करता येईल, याबाबतही लवकरच स्वतंत्र आदेश जारी करण्यात येणार असल्याची माहिती एफडीएने दिली.

### एनर्जी ड्रिंक असं लिहता कामा नये – मुंढे

"त्यामुळे या आदेशात असे स्पष्ट करण्यात आले आहे की, ज्या आधारे किंवा शेड्युल ४ चा आधार घेऊन एनर्जी ड्रिंक असं लिहता कामा नये, त्याच्याविरोधात अन्न व औषध प्रशासनाने आदेश काढले असून, आता यापुढे असे लिहण्याचा प्रकार बंद होईल", असेही तुकाराम मुंढे यांनी स्पष्ट केले. तसेच "शाळेच्या आवारात ५०० मीटर परिसरात कोणत्या वस्तू विक्री करता येतील आणि करता येणार नाहीत, याचा देखील सविस्तर आदेश येत्या दिवसात जारी केला जाईल", असे तुकाराम मुंढे यांनी पत्रकार परिषदेत बोलताना सांगितले.

### आठ प्रकारच्या मानकांची होणार कडक अंमलबजावणी

दूध उत्पादक, दूध गोळा करणाऱ्यांपासून ते कोल्ड चेनपर्यंत, प्रक्रिया करण्यापासून ते वाहतुकीद्वारे विक्रेत्यांपर्यंत दूध पोहोचवण्याकरिता जे जे लोक कार्यरत आहेत, त्या सर्वांना २०११ सालचे परवान्याचे किंवा नोंदणीचे मानक लागू आहेत. अन्न उत्पादन मानके व अन्न संयोजके याचेही नियम लागू आहेत. त्याचबरोबर दूषके, अवशेष याचेही २०११ चे नियम लागू आहेत. विक्रीवरील प्रतिबंध आणि निर्बंध लागू आहेत. लेबलिंग आणि प्रदर्शन, अन्न सुरक्षा पॅकेजिंग, तसेच जाहिरात आणि दावे याचेही नियम लागू असल्याचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी सांगितले.

### नियम कुणाला लागू?

दूध संकलन केंद्र, दूध शीतकरण केंद्र, दुग्ध प्रक्रिया युनिट्स व उत्पादक, पॅकर्स आणि फिलिंग स्टेशन, वितरक, वाहतूकदार, घाऊक विक्रेते, किरकोळ विक्रेते यांना हे नियम लागू असल्याचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी सांगितले.

### शाळांजवळ एनर्जी ड्रिंक्सवरही लक्ष

शैक्षणिक संस्थांच्या ५०० मीटर परिसरात एनर्जी ड्रिंक्ससह कोणत्या खाद्यपदार्थांची विक्री करता येईल आणि कोणत्या वस्तूंवर निर्बंध असतील, याबाबत अन्न व औषध प्रशासन लवकरच स्वतंत्र मार्गदर्शक सूचना जारी करणार आहे. विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने ही कारवाई महत्त्वाची मानली जात आहे.



# पालखीसाठी यंदा ‘जर्मन हँगर मांडव’!

## पालखी सोहळ्यासाठी पुणे महापालिकेची जय्यत तयारी

**महाईन्यूज । पुणे**

**पालखी सोहळ्यात सहभागी होणाऱ्या वारकऱ्यांचे पावसापासून संरक्षण व्हावे, यासाठी महापालिकेने विशेष काळजी घेण्याचे ठरविले आहे. पालखी मुक्कामी असलेल्या भागात वारकऱ्यांच्या सोयीसाठी सहा ‘जर्मन हँगर मांडव’ टाकले जाणार आहेत. तसेच, पत्र्यांचे १९५ मांडवदेखील उभारले जाणार असल्याची माहिती महापौर मंजूषा नागपुरे यांनी दिली.**



- २ हजार शौचालयांची व्यवस्था
- ६ जर्मन हँगर शेड्स
- १९५ मंडप
- १८० फिजिओथेरपिस्ट
- ४०० मेडिकल किट्स
- २० रुग्णवाहिका २२ खासगी रुग्णवाहीका
- ४० आरोग्य पथके
- १०० वैद्यकीय विद्यार्थी
- ४० वैद्यकीय कक्ष
- जागोजागी हिरकणी कक्ष

संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराज यांचा पालखी सोहळा पुढील आठवड्यात शहरात दाखल होणार आहे. या सोहळ्याचे नियोजन करण्यासाठी महापौर नागपुरे यांच्या अध्यक्षतेखाली महापालिकेत बैठक झाली. विविध खात्यांचे विभागप्रमुख या वेळी उपस्थित होते. या बैठकीनंतर झालेल्या पत्रकार परिषदेत पालखी सोहळ्यानिमित्त करण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती नागपुरे यांनी दिली.

यंदाच्या पालखी सोहळ्यानिमित्त महापालिका ‘सेवा वारी’ हा विशेष उपक्रम राबविणार आहे. ‘माझे शहर, माझी जबाबदारी’ या संकल्पनेतून पुणे शहरात होणाऱ्या प्रत्येक सामाजिक उपक्रमाचे दस्तावेजीकरण करण्याचा उद्देश या माध्यमातून साधला जाणार आहे. पालखीच्या निमित्ताने लाखो वारकरी शहरात येणार आहेत. त्यांना आवश्यक त्या सोयीसुविधा पुरविण्यासाठी महापालिका कटिबद्ध असून, प्रत्येकाला जबाबदारी वाटून देण्यात आली आहे.

शहरात दाखल होणाऱ्या लाखो वारकऱ्यांची सेवा ही ईश्वर सेवेइतकीच पवित्र मानून या उपक्रमाला ‘सेवा वारी’ असे नाव देण्यात आले आहे. पालखीची परंपरा, वारीचे सांस्कृतिक महत्त्व आणि पुण्यनगरीची आध्यात्मिक ओळख पुढील पिढीपर्यंत पोहोचावी हा यामागील हेतू आहे. या उपक्रमांतर्गत छायाचित्र स्पर्धा तसेच ० ते १६ वयोगटासाठी वेशभूषा स्पर्धा आयोजित केली जाणार आहे. पालखी पुणे शहरात असल्याने शहरातील रस्ते, भाग तसेच ज्या ठिकाणी वारकरी मुक्कामी असणार आहेत. तेथील परिसर स्वच्छ कसा राहील, याची विशेष काळजी घेतली जाणार आहे.

‘शहरात आगमन झाल्यानंतर पालखी सोहळा ज्या मार्गावरून जाणार आहे तेथील स्वच्छता, जनजागृती आणि सेवा कार्यासाठी स्वयंसेवकांची आवश्यकता आहे. यंदा ‘सेवा वारी’ हा उद्देश असल्याने शहरातील विविध स्वंयसेवी संस्था, सामाजिक संघटना, महाविद्यालयीन विद्यार्थी तसेच नागरिकांनी यामध्ये सहभागी होऊन सेवा द्यावी,’ असे आवाहन महापौर नागपुरे यांनी पुणेकरांना केले आहे.

‘सेवा वारी’ या उपक्रमाची सांगता १० जुलैला रात्री ९ वाजता सामूहिक ‘पसायदान’ म्हणून होणार आहे. विश्वशांती आणि विश्वकल्याणासाठी पुणेकरांनी जिथे असतील तिथून ऑनलाइन किंवा प्रत्यक्ष सहभागी व्हावे, असे आवाहन महापालिकेकडून करण्यात आले आहे.

महापौर मंजुषा नागपुरे म्हणाल्या, पालखी सोहळा शहरात दाखल होणार असल्याने नागरिकांनी वारकऱ्यांची सेवा करण्यासाठी महापालिकेच्या सेवा वारी उपक्रमात सहभागी व्हावी. पालखी सोहळ्याच्या स्वागतासाठी डीजे, मोठ्या आवाजातील स्पीकर्स लावू नये. मोठ्या स्पीकर्सचा दिंडीतील वारकऱ्यांना त्रास होतो. ते टाळण्याचा प्रयत्न करावा.

महापालिकेने वारकऱ्यांच्या सोयीसाठी सुविधा उपलब्ध करुन दिल्या आहेत. यामध्ये आरोग्य व्यवस्था, राहण्यासाठी शाळा, फरती शौचालये, थांबण्यासाठी मंडप, यांचा समावेश आहे.

# 68 वर्ष जूना पानशेत पूल वाहतुकीस बंद, ऐन पावसाळ्यात पुणेकरांचे हाल

**महाईन्यूज । पुणे**

**पानशेत-पुणे मार्गावरील पानशेत वसाहतीजवळील सांडव्यावरील मुख्य पूल वाहतुकीस बंद करण्यात आला आहे. यामुळे राजगड (वेल्हे), मुळशी, हवेली तालुक्यातील सुमारे २८ गावांतील नागरिकांच्या दळणवळणाचा प्रश्न निर्माण झाला आहे. पूल बंद केल्याने ऐन पावसाळ्यात नागरिकांचे हाल होऊ लागले असून, शाळा, कॉलेज, बँका, सरकारी कार्यालयांसह रुग्णालयात जाणाऱ्या नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे.**



### वाहतुकीवर परिणाम

पूल बंद झाल्याने पानशेत-वेल्हे भागातून लवासा-वरसगावकडे आणि पुण्याकडे जाणारी वाहने कुरण खुर्द, खानापूर, गोन्हे, खडकवासला धरणमार्गे कुडजे, मांडवी डावजे निळकंठेश्वर रस्ता मार्गे वळवण्यात आली आहेत. लवासा-वरसगाव धरणाकडून पानशेतकडे जाणारी वाहने निळकंठेश्वर रस्ता, डावजे, कुडजे - खडकवासला धरणमार्गे वळवण्यात आली आहेत. यामुळे सुमारे ९० किलोमीटरचा फेरा पडत आहे, याकडे नागरिकांनी लक्ष वेधले.

गेल्या वर्षी पावसाळ्यात मावळ तालुक्यातील कुंडमळ्याचा धोकादायक पूल कोसळून काही जणांचा मृत्यू झाल्याची घटना घडली होती. त्या घटनेनंतर दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी या घटनेची गंभीर दखल घेऊन जिल्ह्यातील धोकादायक पुलांचे स्ट्रक्चरल ऑडिट करून ते पूल पाडण्याचे आदेश दिले होते. त्या आदेशानुसार बांधकाम विभाग, जलसंपदा विभाग; तसेच जिल्हा परिषदांच्या अखत्यारित येणाऱ्या पुलांचे ऑडिट करण्यात आले. त्यानुसार, जिल्ह्यातील अनेक छोटे-मोठे पूल धोकादायक; तसेच दुरुस्तीसाठी असल्याचे आढळून आले. त्यानुसार धोकादायक पूल पाडण्यापूर्वी ते वाहतुकीस बंद करण्याचे आदेश जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिले आहेत.

पानशेत धरणातून विसर्ग बंद आहे. पूल बंद असल्याने वाहनचालक धोका पत्करून पुलाखालून सांडव्याच्या प्रवाहातून प्रवास करीत आहेत. धरणातून पाणी सोडल्यास हा प्रवास जीवघेणा ठरू शकतो. हा पूल ६८ वर्षांचा असून, तो धोकादायक झाल्याने बंद केला आहे. नवीन ७७ मीटर लांबीचा पूल बांधण्यासाठी प्रस्ताव ‘नाबार्ड’कडे पाठविला आहे. मात्र, बांधकाम पूर्ण होईपर्यंत पूल बंद राहणार आहे.

परिसरातील गावांसाठी महत्त्वाचा दळणवळणाचा मार्ग असल्याने पर्यायी व्यवस्था उपलब्ध करून दिल्याशिवाय पूल बंद करू नये, अशी मागणी करण्यात आली आहे; तसेच ‘अवजड वाहने आणि माती वाहतूक करणाऱ्या वाहनांवर निर्बंध घालावेत. स्थानिकांच्या वाहतुकीसाठी पूल सुरू ठेवावा,’ अशी मागणी नागरिकांनी प्रशासनाकडे केली आहे.

# महेश लांडगे यांच्या पाठपुराव्याला मोठे यश!

## चिखली–मोशी परिसरात आधुनिक एसटी बस स्थानकासाठी परिवहन मंत्र्यांचे तातडीचे आदेश

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवडसह पुणे जिल्ह्याच्या उत्तर भागातील चिखली किंवा मोशी येथे आधुनिक एसटी बस स्थानक उभारण्याच्या मागणीची राज्य शासनाने तातडीने दखल घेतली आहे. भाजपाचे आमदार महेश किसनराव लांडगे यांनी केलेल्या पाठपुराव्यानंतर राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ प्रशासनाला या प्रस्तावावर त्वरीत कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत.**



आमदार महेश लांडगे यांनी दि. २५ जून रोजी परिवहन मंत्र्यांना निवेदन सादर करून चिखली किंवा मोशी परिसरातील आरक्षित जागेवर आधुनिक व सुसज्ज एसटी बस स्थानक उभारण्याची मागणी केली होती. या निवेदनाची दखल घेत परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी संबंधित प्रस्तावाची तातडीने तपासणी करून आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाला दिल्या आहेत. विधानसभा पावसाळी अधिवेशनाच्या निमित्ताने आमदार लांडगे यांनी आज परिवहन मंत्री सरनाईक यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी सकारात्मक निर्णय घेत पुढील कार्यवाहीचे आदेश दिले.

या बैठकीनंतर परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर यांना तातडीने निर्देश देत, पुणे विभाग नियंत्रकांमार्फत सर्वेक्षण करून चिखली किंवा मोशी परिसरातील योग्य ठिकाणी नवीन एसटी बस स्थानक उभारणीची कार्यवाही जलदगतीने करण्याचे आदेश दिले. तसेच पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आयुक्तांनी बस स्थानकासाठी आवश्यक जागा उपलब्ध करून देण्याबाबतही संबंधित स्तरावर आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

गेल्या दशकात चिखली, मोशी, चऱ्होली, बोऱ्हाडेवाडी, जाधववाडी, तळवडे आणि स्पाईन रोड परिसरात मोठ्या प्रमाणावर नागरीकरण झाले आहे. त्यामुळे या भागातील लाखो नागरिकांना आंतरजिल्हा व राज्यांतर्गत प्रवासासाठी शहरातील इतर एसटी बस स्थानकांवर अवलंबून राहावे लागते. नवीन बस स्थानक उभारल्यास नागरिकांचा वेळ आणि खर्च वाचण्यास मदत होईल, तसेच शहरातील विद्यमान बस स्थानकांवरील ताणही कमी होणार आहे.

चिखली-मोशी परिसर हा पुणे-नाशिक महामार्गालगत असून, वाकड-हिंजवडी परिसर मुंबई-बंगळुरू महामार्गाशी जोडलेला आहे. त्यामुळे या दोन्ही भागांपैकी योग्य ठिकाणी एसटी बस स्थानक उभारल्यास उत्तर पिंपरी-चिंचवडसह औद्योगिक क्षेत्रातील कर्मचारी, विद्यार्थी आणि प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे. परिवहन मंत्र्यांच्या निर्देशांनंतर आता महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाकडून तांत्रिक व प्रशासकीय प्रक्रिया वेगाने पूर्ण करून प्रस्ताव पुढे नेण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

> “चिखली किंवा मोशी येथे आधुनिक एसटी बस स्थानक उभारण्याची मागणी ही पिंपरी-चिंचवडसह उत्तर पुणे जिल्ह्यातील लाखो नागरिकांच्या दैनंदिन गरजांशी संबंधित आहे. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी या मागणीची तातडीने दखल घेत महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाला त्वरीत कार्यवाहीचे निर्देश दिल्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार. या बस स्थानकामुळे नागरिकांना अधिक सुलभ, सुरक्षित आणि दर्जेदार प्रवासी सेवा मिळेल. हा प्रकल्प लवकरात लवकर प्रत्यक्षात यावा, यासाठी शासन आणि संबंधित यंत्रणांकडे मी सातत्याने पाठपुरावा करणार आहे.”
>
> **- महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**

### प्रवाशांसाठी ठरणार गेमचेंजर!

चिखली–मोशी परिसरात आधुनिक एसटी बस स्थानक उभारल्यास उत्तर पिंपरी-चिंचवडमधील लाखो नागरिकांना शहरातील इतर बस स्थानकांवर अवलंबून राहावे लागणार नाही. आंतरजिल्हा व राज्यांतर्गत प्रवास अधिक सुलभ होईल, वेळ आणि खर्चाची बचत होईल, तसेच विद्यमान बस स्थानकांवरील ताणही मोठ्या प्रमाणात कमी होण्यास मदत होणार आहे.

# ताथवडेतील पोलीस मुख्यालयाच्या प्रस्तावाला खासदार बारणे यांचा आक्षेप



**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**वाढत्या प्रदूषणामुळे ताथवडे येथील पशुसंवर्धन विभागाच्या अधिपत्याखालील वळुमाता प्रक्षेत्रातील शासकीय जागेवर ११ लाख झाडांची लागवड केली आहे. त्यामुळे या भागातील नागरिकांना हिरवाई अनुभवता येत असून नागरिकांना दिलासा मिळत आहे. त्यातच ही जागा पोलीस आयुक्तालयासाठी दिली.**

आयुक्तालयाच्या कामासाठी झाडांवर कुऱ्हाड चालवावी लागेल. त्यामुळे येथीलच यशदासाठी दिलेल्या जागेपैकी ५० एकर जागा पोलिसांसाठी द्यावी अशी विनंती खासदार श्रीरंग बारणे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना केली.

याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन दिले आहे. त्यात खासदार बारणे यांनी म्हटले आहे की, महाराष्ट्र शासनाच्या पशुसंवर्धन विभागाच्या सुमारे ५० एकर जागेवर पिंपरी-चिंचवड पोलीस आयुकालय उभारण्यासाठी जागा देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मात्र, हा निर्णय घेताना या परिसरातील पर्यावरणीय परिस्थिती, जैवविविधता व मोठ्या प्रमाणावर असलेली वृक्षसंपदा यांचा पुरेसा विचार झालेला दिसून येत नाही. या परिसरात हुंदाई कंपणीच्या वतीने सीएसआर उपक्रमांतर्गत वनराई संस्थेमार्फत सुमारे ११ लाख वृक्षांची लागवड करण्यात आली आहे. ही जागा पूर्वापार शेतीची असल्यामुळे तेथे अनेक वर्षांपासून मोठ्या प्रमाणात नैसर्गिक व जुने वृक्ष अस्तित्वात आहेत. अशा ठिकाणी मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड करून बांधकाम अथवा मैदान विकसित करणे हे पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टीने अत्यंत अयोग्य ठरेल. शहरातील हरित क्षेत्र टिकविणे ही आजची अत्यंत महत्त्वाची गरज आहे.

> पोलीस आयुक्तालयाला जागा देण्यास कोणतीही हरकत नाही. परंतु, या जागेवर ११ लाख झाडांची लागवड केली आहे. वाढत्या प्रदूषणामुळे झाडांची मोठी आवश्यकता आहे. यशदाला दिलेल्या जागेपैकी ५० एकर जागाआयुक्तालयासाठी देण्याचा विचार करावा, अशी विनंती मुख्यमंत्र्यांना केली आहे.
>
> **- श्रीरंग बारणे, खासदार, मावळ लोकसभा, मतदार संघ.**

### यशदाच्या जागेचा पर्याय सुचविला

ताथवडे येथे यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा) यांना यापूर्वी देण्यात आलेल्या ७५ एकर जागेपैकी ५० एकर जागा पोलीस आयुक्तालयासाठी उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी खासदार श्रीरंग बारणे यांनी केली आहे. यामुळे ताथवडेतील ११ लाख झाडांची वृक्षसंपदा अबाधित राहील आणि पोलीस मुख्यालयासाठीही पर्यायी जागेची उपलब्धता होईल, असे त्यांनी म्हटले आहे.

### 'सेंटर पार्क'साठी जागा महापालिकेकडे द्या

पशुसंवर्धन विभागाची सुमारे ६७ हेक्टर जागा विभागाच्या मालकीची कायम ठेवून तिचे व्यवस्थापन पिंपरी-चिंचवड महापालिकेकडे सोपवावे. त्या ठिकाणी भव्य 'सेंटर पार्क' विकसित केल्यास शहराला मोठे हरित क्षेत्र उपलब्ध होईल, पर्यावरण संवर्धनाला चालना मिळेल आणि भावी पिढ्यांसाठी नैसर्गिक वारसा जतन करता येईल, अशी मागणी खासदार श्रीरंग बारणे यांनी केली आहे.



## भूमिका

**राजकारणात पक्षांची ताकद केवळ सभांवर किंवा घोषणांवर ठरत नाही; ती संघटनेतील कार्यकर्ते, पदाधिकारी आणि लोकप्रतिनिधी किती काळ नेतृत्वासोबत राहतात यावर ठरते. अलीकडच्या काळात उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेतील सातत्याने होत असलेल्या गळतीने हा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आणला आहे.**

# उद्धव ठाकरे : निष्ठा की नेतृत्वाचा प्रश्न?



अनेक खासदार, आमदार आणि स्थानिक नेत्यांनी वेगवेगळ्या टप्प्यांवर पक्षाची साथ सोडली. वरळीसारख्या पक्षाच्या बालेकिल्ल्यातील घडामोडींनीही संघटनात्मक आव्हाने अधोरेखित केली आहेत.

राजकारणात निष्ठेला महत्त्व असले, तरी ती टिकविण्यासाठी संवाद, विश्वास आणि भविष्यातील राजकीय संधी यांची जोड आवश्यक असते. कार्यकर्त्यांना नेतृत्व सहज उपलब्ध नसल्याची भावना निर्माण झाली, तर अस्वस्थता वाढते आणि त्याचा परिणाम पक्षसंघटनेवर होतो. सत्तेचे आकर्षण हा राजकारणाचा वास्तववादी भाग असला, तरी नेतृत्वाने आपल्या सहकाऱ्यांशी सातत्याने संपर्क ठेवणे तितकेच महत्त्वाचे असते.

बदलत्या राजकीय परिस्थितीनुसार कार्यपद्धतीत बदल करणे ही काळाची गरज आहे. भावना कार्यकर्त्यांना प्रेरणा देतात; मात्र निवडणुकीतील यशासाठी संघटनात्मक नियोजन, राजकीय गणित आणि प्रभावी नेतृत्व आवश्यक असते. पक्षातील मतभेद वेळेत सोडवले नाहीत, तर ते हळूहळू मोठ्या गळतीत रूपांतरित होऊ शकतात. म्हणूनच कोणताही पक्ष आपल्या संघटनेतील नाराजी वेळेवर ओळखतो का, हा प्रश्न अधिक महत्त्वाचा ठरतो.

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या काळातही काही मोठे नेते पक्षातून बाहेर पडले होते. मात्र त्यांनी नव्या नेतृत्वाला संधी देत संघटना उभी ठेवली. त्यामुळे कोणत्याही पक्षासाठी व्यक्तिपेक्षा संघटना अधिक महत्त्वाची असते, हा धडा इतिहासाने वारंवार दिला आहे. आजही शिवसेनेसाठी हेच वास्तव लागू होते. उरलेल्या संघटनेला बळ देणे, नव्या पिढीतील कार्यकर्त्यांना संधी देणे आणि विश्वासाचे वातावरण निर्माण करणे ही नेतृत्वासमोरील मोठी जबाबदारी आहे.

दरम्यान, एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना सातत्याने विस्तारत असल्याचे चित्र दिसत आहे. मात्र कोणत्याही पक्षाची वाढ ही कायमस्वरूपी असतेच असे नाही. राजकारणात परिस्थिती, समीकरणे आणि जनमत सातत्याने बदलत असते. त्यामुळे प्रत्येक पक्षाने आपल्या संघटनेची ताकद वाढविण्यावर भर देणे आवश्यक आहे.

राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांनी काही काळानंतर जवळीक वाढवली असली, तरी ती अधिक प्रभावी राजकीय सहकार्यात रूपांतरित झालेली दिसत नाही. आगामी स्थानिक स्वराज्य संस्था आणि इतर निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर विरोधी मतांचे एकत्रीकरण करायचे असेल, तर अधिक समन्वयाची गरज भासू शकते.

राजकारणात वारसा प्रारंभाची संधी देतो; परंतु भवितव्य नेतृत्वाच्या निर्णयक्षमतेवर, संघटन उभारणीवर आणि कार्यकर्त्यांशी असलेल्या नात्यावर अवलंबून असते. आत्मपरीक्षण, संवाद आणि काळानुरूप बदल स्वीकारण्याची तयारी असेल, तर कोणताही पक्ष नव्याने उभारी घेऊ शकतो. अन्यथा गळतीचे सत्र सुरूच राहते आणि संघटना कमकुवत होत जाते. हे वास्तव केवळ एका पक्षापुरते मर्यादित नसून प्रत्येक राजकीय पक्षासाठी तितकेच लागू आहे.

## प्रासंगिक »

### दृष्टीकोन बदला

**फळांनी आणि फुलांनी बहरलेले एक झाड अनेक पक्ष्यांना आश्रय देत असे. वाटसरूंना सावली, तर भुकेल्यांना फळे देत असल्याने सर्वजण त्याचे कौतुक करत.**

हळूहळू झाडाला स्वतःच्या श्रेष्ठत्वाचा गर्व झाला. काही वर्षांनी त्याला फळे-फुले येणे बंद झाले, पाने गळू लागली आणि पक्षीही दुसरीकडे जाऊ लागले. सावली नसल्याने वाटसरूंनीही पाठ फिरवली. त्यामुळे झाड खूप दुखी झाले. त्याच वेळी तेथून जाणाऱ्या एका सिद्धपुरुषाला त्याने आपली व्यथा सांगितली. सिद्धपुरुष म्हणाले, "आयुष्यभर तू इतरांसाठी जगलास. आता तुझे लाकूड घरबांधणी, फर्निचर, इंधन अशा अनेक कामांसाठी उपयोगी पडेल. तुझा शेवटही इतरांच्या हितासाठीच होणार आहे. त्यामुळे दुःख नको, तर समाधान बाळग."

हे ऐकताच झाडाचा दृष्टीकोन बदलला. त्याला आपल्या अस्तित्वाचे खरे महत्त्व उमगले आणि त्याने उरलेले आयुष्य शांतपणे स्वीकारले.

- तात्पर्य : जीवनात परिस्थिती बदलत असते; पण सकारात्मक दृष्टीकोन कायम ठेवला तर प्रत्येक संकटातही नवी संधी दिसते. विचार बदलले की जग बदलल्यासारखे वाटते.

भारत आणि ब्रिटन यांच्यात १५ जुलैपासून अंमलात येणारा व्यापक आर्थिक व व्यापार करार हा भारतीय अर्थव्यवस्थेसाठी महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे. जगातील प्रमुख अर्थव्यवस्थांपैकी एका देशासोबत झालेल्या या करारामुळे भारतीय उद्योग, शेती, सेवा क्षेत्र आणि निर्यात व्यवसायाला नवी दिशा मिळण्याची अपेक्षा आहे.

# विकसित भारताच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल



वाढत्या जागतिक स्पर्धेच्या काळात भारतीय उत्पादनांना मोठ्या बाजारपेठेत प्रवेश मिळणे ही देशासाठी सकारात्मक बाब ठरू शकते. या करारामुळे कृषी प्रक्रिया उद्योग, वस्त्रोद्योग, रत्न-आभूषण, अभियांत्रिकी, माहिती तंत्रज्ञान, औषधनिर्मिती, हस्तकला आणि सेवा क्षेत्रातील अनेक उत्पादनांना ब्रिटनमध्ये अधिक संधी उपलब्ध होणार आहेत. विशेष म्हणजे हळद, मसाले, प्रक्रिया केलेले अन्नपदार्थ, लोणची, डाळी यांसारख्या भारतीय उत्पादनांच्या निर्यातीला चालना मिळण्याची शक्यता आहे. यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळ मिळण्याबरोबरच मूल्यवर्धित उत्पादनांमध्ये रोजगारनिर्मिती वाढू शकते.

सेवा क्षेत्रासाठीही हा करार महत्त्वाचा आहे. माहिती तंत्रज्ञान, आर्थिक सेवा, शिक्षण, आरोग्य, अभियांत्रिकी आणि व्यावसायिक सल्ला या क्षेत्रांतील भारतीय कंपन्या व तज्ज्ञांना ब्रिटनमध्ये अधिक संधी उपलब्ध होतील. अल्पकालीन कामासाठी जाणाऱ्या भारतीय व्यावसायिकांना सामाजिक सुरक्षा योगदानातून मिळणारी सूट हीदेखील महत्त्वाची तरतूद मानली जात आहे. त्यामुळे भारतीय कंपन्यांचा खर्च कमी होण्यास मदत होईल. व्यापार कराराचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे गुंतवणुकीला चालना मिळण्याची शक्यता. जागतिक स्तरावर भारताची विश्वासार्ह आर्थिक भागीदार म्हणून ओळख अधिक मजबूत होत आहे. सातत्याने वाढणारी अर्थव्यवस्था, सुधारित पायाभूत सुविधा आणि धोरणात्मक स्थैर्य यामुळे परदेशी गुंतवणूकदारांचा भारताकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला आहे. अशा करारांमुळे उद्योग, रोजगार आणि तंत्रज्ञान हस्तांतरणाला गती मिळू शकते.

तथापि, कोणत्याही मुक्त व्यापार कराराचे यश केवळ करारावर नव्हे, तर त्याच्या प्रभावी अंमलबजावणीवर अवलंबून असते. भारतीय उत्पादकांनी गुणवत्ता, जागतिक मानके आणि स्पर्धात्मकता यावर भर देणे आवश्यक आहे. लघु व मध्यम उद्योग, शेतकरी आणि निर्यातदारांना आवश्यक पायाभूत सुविधा व धोरणात्मक मदत मिळाल्यास या कराराचा लाभ अधिक व्यापक स्वरूपात समाजापर्यंत पोहोचू शकेल.

एकंदरीत, भारत–ब्रिटन व्यापार करार हा केवळ व्यापार वाढविणारा करार नसून भारताला जागतिक अर्थव्यवस्थेत अधिक प्रभावी स्थान मिळवून देण्याच्या दिशेने उचललेले महत्त्वाचे पाऊल आहे. योग्य नियोजन, उद्योगक्षमता आणि सातत्यपूर्ण अंमलबजावणी यांच्या बळावर हा करार देशाच्या आर्थिक विकासाला नवी गती देऊ शकतो.

## ।। अभंगवाणी ।।



दुजा ऐंसा कोण बळी आहे आतां ।
हरि या अनंता पासूनिया ॥१॥

बळियाच्या आम्ही जालों बळिवंता ।
करूं सर्व सत्ता सर्वांवरी ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# ठाकरेंकडून 'रामरक्षा' आंदोलनाची घोषणा!

## अब हिंदू माफ नहीं करेगा; उद्धव ठाकरे यांचा भाजपावर गंभीर आरोप

**महाईन्यूज । मुंबई**

**अयोध्येतील राम मंदिरात रामभक्तांनी दिलेल्या देणगीचा अपहार झाला असून याप्रकरणी एसआयटी चौकशी सुरू आहे. यावरून देशभरातील रामभक्तांनी संताप व्यक्त केला आहे. आता राज्याचे माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी आंदोलनाची हाक दिली आहे. राज्यातील रामभक्तांनी रविवारी, ५ जुलै रोजी दादर येथील कबुतरखाना येथे असलेल्या मारुती मंदिराजवळ आंदोलन करण्याचे आवाहन केले आहे. आज त्यांनी पत्रकार परिषद घेऊन यासंदर्भातील माहिती दिली.**



"संपूर्ण देशात गोंधळ, सर्वासामान्यांबद्दल अनास्था ओढावली आहे. कोणाला कोणाचं उत्तरदायित्वच राहिलेलं नाही. याच्या मुळावर आघात करण्याची वेळ आली आहे. संपूर्ण देश हा आज भाजपाच्या अंमलाखाली आहे. राम मंदिर हे भाजपाच्या सत्तेचं मूळ आहे ज्यात आम्हीही सहभागी होतो. राम मंदिरासाठी जे आंदोलन झालं होतं, त्यात अनेक शिवसैनिक होते. देशातील तमाम हिंदू सहभागी होता. तो काळही आठवत असेल. आपल्या माध्यमातून हे सारं दृष्य जनतेच्या मनात खोलवर रुजलेले आहे. कारसेवकांवरील अत्याचार, गोध्रामधील दंगल, अहमदाबादमधील दंगल, मुंबईतील बॉम्बस्फोटमध्ये हिंदूंनी बरंच काही सोसलं होतं", अशी आठवण उद्धव ठाकरेंनी शेअर केली.

पुढे भाजपावर टीका करताना ते म्हणाले, "राम मंदिरासाठी हे आंदोलन सुरू होण्याआधी भाजपाचे संपूर्ण देशात दोनच खासदार होते. गांधीवादी समाजवाद हा त्यांनी अंगिकारलेला कार्यक्रम होता. तो कार्यक्रम सोडून ते हिंदूत्त्वाकडे वळले आणि राम मंदिराच्या कार्याला हात घातला आणि आज याचं भांडवल करून ते देशात अमर्याद सत्ता उपभोगत आहेत. अशा या भाजपाच्या काळात राम मंदिर हा मुद्दा वेगळ्या गोष्टीमुळे चर्चिला जातोय, हे दुर्दैवं आहे. आज राजकीय दरोडेखोरी सुरू आहे, आमदार- खासदार चोरले जात आहेत, त्याला ऑपरेशन नाव दिलं जातंय मग आता ऑपेरशन राम मंदिर भाजपा करतंय का हा मुद्दा आहे. या बातम्या दाखवल्या जात असतील-नसतील, पण चोरी तर होतेय. राम मंदिरावर दरोडा टाकला गेलाय, त्याबाबत पुरावेही दिले आहेत. त्या चोरीचा पैसा पक्ष फोडण्याकरता वापरला जात आहे, असं म्हटलं जातंय, हे फार गंभीर आहे", असं उद्धव ठाकरे म्हणाले.

"एकदा अटल बिहारी वाजपेयी म्हणाले होते, अब हिंदू मार नहीं खाएगा. तसं आज मी म्हणतोय की आता हिंदू माफ नहीं करेगा, असं म्हणायची वेळ आली आहे. जे जे मंदिर लुटत आहेत, त्यांना हिंदू जागा दाखवल्याशिवाय राहणार नाही", असं म्हणत उद्धव ठाकरेंनी रामरक्षा आंदोलनाची हाक दिली.

"त्याची सुरुवात येत्या रविवारपासून करत आहोत. येत्या रविवारी ५ जुलैला सायंकाळी ४ च्या सुमारास रामरक्षा आंदोलन करत आहोत. दादरच्या कबुरतखाना येथील मारुतीच्या मंदिरासमोर तमाम हिंदूंना येथे जमायचं आहे. पक्ष वगैरे न पाहता जे जे हिंदू आहेत, रामाच्या मंदिरात होत असलेली चोरी सहन होत नाहीय, ज्यांना जाब विचारायचा आहे, ते सर्व रविवारी येतील. मी स्वतः तिथे जाणार आहे. माझ्यासोबत शिवसेनेचे नेते, लोकप्रतिनिधी असतील. शिवसैनिक, तमाम रामभक्त तेथे येतील. ज्यांनी ज्यांनी हिंदूत्त्व सोडलेलं नाही, बाळासाहेबांचे विचार सोडलेले नाहीत, हिंदू असतील तर त्यांनी इथं यावं. तिथे रामरक्षा आंदोलन करत आहोत", अशी माहिती उद्धव ठाकरेंनी दिली.

### राज्यभर आंदोलन होणार

"हिंदूंना जागं करण्याकरता महाआरती करत होतो. आता हिंदू जागे झाले आहेत, आता हिंदूंनी जाब विचारावा म्हणून हा कार्यक्रम जाहीर करत आहोत. परवाचा कार्यक्रम ही सुरुवात आहे, त्यानंतर राज्यपातळीवर जिथे जिथे राम मंदिर, हनुमान मंदिर असेल तिथे सर्व रामभक्त एकत्र होऊन भाजपाला याचं उत्तरदायित्व स्वीकारायला लावल्याशिवाय राहणार नाही", असंही उद्धव ठाकरे म्हणाले.

# शाळांच्या परिसरात अपायकारक स्टिंग एनर्जी ड्रिंक व अन्नपदार्थ विक्रीस बंदी!

**महाईन्यूज । मुंबई**

**शाळांच्या परिसरात विद्यार्थ्यांच्या आरोग्यास अपायकारक ठरणारे अन्नपदार्थ, तसेच स्टिंग एनर्जी सारखी कॅफिनयुक्त पेयांची विक्री करण्यास सरकाने बंदी घातली आहे. अशा पेयांची विक्री होत आल्यास संबंधितांवर कारवाई करण्यात येईल, अशी माहिती अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी विधानसभेत दिली.**






स्टिंग एनर्जी ड्रिंकच्या सेवनामुळे आरोग्यावर होणाऱ्या दुष्परिणामांबाबत सदस्य विक्रम पाचपुते यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मंत्री झिरवाळ बोलत होते. यावेळी सदस्य राहुल कुल आणि वरुण सरदेसाई यांनीही उपप्रश्न उपस्थित केले.

मंत्री झिरवाळ म्हणाले की, शाळांच्या आवारात व परिसरात बालकांच्या आरोग्यास अपायकारक अन्नपदार्थ आणि कॅफिनयुक्त पेयांची विक्री होऊ नये, यासाठी संबंधित यंत्रणांना आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत. अशा प्रकारची विक्री आढळल्यास त्याची माहिती अन्न व औषध प्रशासनाला देण्याबाबत पालक, शिक्षक, मुख्याध्यापक तसेच जिल्हा परिषदांना सूचित करण्यात आले असून संबंधितांवर कायद्यानुसार कारवाई केली जाईल.

राज्यात अन्न व औषधांच्या नमुन्यांच्या तपासणीसाठी सध्या संभाजीनगर, नागपूर आणि मुंबई येथे तीन प्रयोगशाळा कार्यरत आहेत. याशिवाय रायगड, नाशिक, यवतमाळ आणि पुणे येथे नवीन प्रयोगशाळा सुरू करण्यात येणार असून सार्वजनिक-खासगी भागीदारी तत्त्वावर आणखी २२ प्रयोगशाळा उभारण्यात येणार आहेत. त्यामुळे अन्ननमुने तपासणीची प्रक्रिया अधिक वेगवान होईल, असे मंत्री झिरवाळ यांनी सांगितले.

मंत्री झिरवाळ यांनी सांगितले की, एप्रिल २०२५ ते मे २०२६ या कालावधीत स्टिंग एनर्जी ड्रिंकचे २७ अन्ननमुने विश्लेषणासाठी घेण्यात आले असून त्यापैकी १० नमुने प्रमाणित घोषित करण्यात आले आहेत. तसेच एप्रिल २०२५ ते मार्च २०२६ या कालावधीत विविध एनर्जी ड्रिंकचे ११५ अन्ननमुने विश्लेषणासाठी घेण्यात आले. त्यापैकी ६३ नमुने प्रमाणित, एक नमुना कमी दर्जाचा आणि सहा नमुने मिथ्याछाप घोषित करण्यात आले असून उर्वरित नमुन्यांच्या तपासणीची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती त्यांनी दिली.

# तमिळनाडूमध्ये पुन्हा एकदा टोकाचे राजकारण?

## मुख्यमंत्री विजय यांच्याबद्दल अपशब्द काढल्यानंतर द्रमुकच्या आमदाराला अटक

**महाईन्यूज I तमिळनाडू**

**तमिळनाडूमध्ये एकेकाळी करुणानिधी आणि जयललिता यांच्यातील टोकाचे वैर पाहायला मिळाले होते. सत्तेत आल्यानंतर विरोधकांवर फौजदारी कारवाई करण्याचा तमिळनाडूचा वादग्रस्त राजकीय इतिहास राहिला आहे. त्याचीच पुन्हा एकदा प्रचिती एका ताज्या प्रकरणामुळे आली आहे. मुख्यमंत्री जोसेफ विजय यांच्याबद्दल अपशब्द वापरल्याच्या कारणावरून माजी मंत्री आणि विद्यमान आमदार अनिता आर. राधाकृष्णन यांना अटक करण्यात आली आहे.**





अटकेची कारवाई टाळण्यासाठी अनिता राधाकृष्णन यांनी मद्रास उच्च न्यायालयात धाव घेतली होती. मात्र उच्च न्यायालयाने त्यांना अंतरिम जामीन देण्यास विरोध केल्यानंतर तुतीकुडी पोलिसांनी त्यांना अटक केली.

राधाकृष्णन हे तिरुचेंदूर विधानसभा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करतात. तसेच दक्षिण तुतीकुडी जिल्ह्याचे द्रमुक पक्षाचे सचिव म्हणूनही ते काम करतात. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ऑथूर नगर पंचायतीच्या कार्यालयात काही कागदपत्रे तपासत असताना पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतले. त्यानंतर त्यांना तुतीकुडी जिल्हा अधीक्षक कार्यालयात आणले गेले. तिथे अतिरिक्त जिल्हा अधीक्षकांनी त्यांची चौकशी केली.

मद्रास उच्च न्यायालयाचे न्यायाधीश जी. के. इलंथिरैयन यांनी राधाकृष्णन यांच्या भाषणाचा भाषांतर केलेला मजकूर वाचल्यानंतर त्यांचा अंतरिम जामीन फेटाळून लावला. न्यायाधीशांनी भाषणाच्या मजकूरावर नाराजी व्यक्त केली. ते म्हणाले, माजी मंत्री आणि विद्यमान आमदार मुख्यमंत्र्यांबाबत अशी भाषा कशी काय वापरू शकतो.

ते काही सामान्य व्यक्ती नाहीत. त्यांनी मुख्यमंत्र्यांच्या पदाचा आदर ठेवू नये का? असाही प्रश्न न्यायाधीशांनी विचारला. राधाकृष्णन यांच्या वकिलांनी युक्तिवाद करताना म्हटले की, आमदारांचे भाषण जरी अपमानकारक असले तरी त्यामुळे पोलिसांनी जे गुन्हे दाखल केले आहेत, ते लागू होत नाहीत. आमदारांच्या विधानातून दोन गटांमध्ये वैर निर्माण होण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

मात्र सरकारी वकिलांनी याचा विरोध केला. आमदार राधाकृष्णन यांनी केलेली विधाने ही खूपच अपमानास्पद आणि द्रमुक तसेच टीव्हीके पक्षाच्या कार्यकर्त्यांना चिथावणी देणारी होती. राधाकृष्णन यांच्या अटकेनंतर महापालिका महापौर जेगन पेरियासामी यांच्या नेतृत्वाखाली द्रमुक पक्षाच्या कार्यकर्त्यांनी अधीक्षक कार्यालयाबाहेर आंदोलन केले.

### प्रकरण काय आहे?

ऑथूर शहराचे टीव्हीके पक्षाचे सचिव एस. सेल्वम यांनी दिलेल्या तक्रारीनंतर राधाकृष्णन यांच्यावर २३ जून रोजी पोलिसांनी गुन्हा दाखल करण्यात आला होता. २० जून रोजी ऑथूर येथे झालेल्या द्रमुक पक्षाच्या सभेत राधाकृष्णन यांनी मुख्यमंत्री विजय यांच्याबाबत अवमानकारक आणि चिथावणीखोर विधान केल्याचा आरोप करण्यात येत आहे. पोलिसांनी भारतीय न्याय संहितेच्या कलम ३५२, ३५३ (२) या कलमांनुसार गुन्हा दाखल केला.

# दोन वर्षांपासून अमेरिकेत राहणाऱ्या गुजराती कुटुंबाचा आगीमुळे गुदमरुन मृत्यू

**महाईन्यूज I अमेरिका**

**अमेरिकेला जाऊन स्थायिक व्हावं असं कुणाला वाटत नाही? गुजरातच्या हितेशभाई सुथार यांनीही हे स्वप्न पाहिलं. दोन वर्षांपासून ते अमेरिकेतील वुस्टर शहरात वास्तव्य करत होते. या ठिकाणी असलेल्या इकोनो लॉज या मॉटेलमध्ये हितेशभाई त्यांची पत्नी हीनाबेन आणि २० वर्षांची मुलगी ईशानी या मॉटेलमध्ये राहात होते. मात्र या मॉटेलला आग लागली आणि आगीच्या धुरामुळे गुदमरुन या तिघांचाही मृत्यू झाला.**



हितेशभाई सुथार हे गुजरातमधल्या नडियाडचे होते. दोन वर्षांपूर्वी ते कुटुंबासह अमेरिकेला गेले होते. हितेशभाई हे याच मॉटेलमध्ये काम करत होते. या मॉटेलच्या एका खोलीत ते कुटुंबासह राहात होते. मात्र बुधवारी रात्री या मॉटेलला भीषण आग लागली. यावेळी हितेशभाई आणि त्यांचं कुटुंब झोपलं होतं. मॉटेलला जी आग लागली त्यामुळे धूर सगळीकडे पसरला. त्यांच्या खोलीतही धुराचे लोट पसरले. एकच हलकल्लोळ माजल्याने कुणीही बाहेर पडू शकलं नाही. या आगीमुळे जो धूर निर्माण झाला त्यात गुदमरुन आणि आगीत होरपळून या तिघांचा मृत्यू झाला. हितेशभाई यांनी मदतीसाठी फोन केला होता. त्यांना कुटुंबासह बाथरुममध्ये जा आणि तिथला शॉवर तसंच नळ सुरु करा आणि आतच थांबा असा उपाय सुचवण्यात आला होता. या तिघांनी तो उपाय केला मात्र हे कुटुंब वाचू शकलं नाही. कारण आग इतकी भयंकर होती की आगीवर नियंत्रण मिळवता मिळवता अग्निशमन दलाला बराच वेळ गेला. त्यावेळी बाथरुममध्ये गुदमरुन या तिघांचा मृत्यू झाला. हितेशभाई यांच्यासह कुटुंबही ठार झालं. ही बातमी नडियाद गावात पोहचताच सुथार कुटुंबासह संपूर्ण गावावर शोककळा पसरली.

### आग नियंत्रणात आणण्यासाठी बराच वेळ गेला आणि...



समोर आलेल्या माहितीनुसार रात्री १.३० वाजण्याच्या सुमारास ही आग लागली. आग लागल्यानंतर ती वाढली आणि इमारतीत वेगाने पसरली. काही वेळातच आगीचे लोळ आणि धुराचे लोट वाढले. अग्निशमन दलास बोलवण्यात आलं. त्यांनी आग नियंत्रणात आणण्यासाठी त्यांनी बरेच प्रयत्न केले पण आग मोठ्या प्रमाणावर पसरली होती. त्यामुळे ती नियंत्रणात आणण्यात अग्निशमन दलाचा बराच वेळ गेला. या दरम्यान हितेश सुथार, हीना आणि त्यांची मुलगी ईशानी हे त्यांना देण्यात आलेल्या सूचनेप्रमाणे खोलीच्या बाथरुममध्येच होते. आगीचे लोळ आणि धुराचे लोट आपल्यापर्यंत पोहचणार नाहीत असं त्यांना वाटलं होतं. पण आग नियंत्रणात आणण्यासाठी बराच वेळ गेला ज्यामुळे धूर खोलीत कोंडला गेला आणि गुदमरुन हितेश सुथार, हीना सुथार आणि त्यांची मुलगी ईशानी यांचा मृत्यू झाला.



# कॅटरिनाच्या कमबॅकची चर्चा

कॅटरिना कैफ दीर्घकाळापासून मोठ्या पडद्यावर दिसून आलेली नाही. अशास्थितीत अभिनेत्री एका सीक्वेलसाठी बोलणी करत आहे. या चित्रपटात तब्बू देखील मुख्य भूमिकेत असू शकते. कॅटरिना कैफ सीक्वेल चित्रपटाद्वारे मोठ्या पडद्यावर परतण्यास तयार असल्याचे समजते. निर्मात्यांनी या प्रोजेक्टविषयी अधिक माहिती देणे टाळले आहे. तर कॅटरिना या प्रोजेक्टमध्ये सामील असल्याचे कळताच तिच्या चाहत्यांदरम्यान मोठा उत्साह निर्माण झाला आहे. कॅटरिना कैफ 2001 मध्ये प्रदर्शित चित्रपट 'चांदनी बार'चा सीक्वेल 'चांदनी बार 2'साठी तयारी करत आहे. या सीक्वेलचे दिग्दर्शन अजय बहल करणार असून सध्या याच्या कलाकारांची निवड करण्याची प्रक्रिया सुरू



# आमिर खान पुन्हा अडकणार विवाहबंधनात?

बॉलिवूडचा 'मिस्टर परफेक्शनिस्ट' म्हणून ओळखला जाणारा आमिर खान पुन्हा एकदा त्याच्या वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत आला आहे. गेल्या काही महिन्यांपासून आमिर खान आणि त्याची मैत्रीण गौरी स्प्रॅट यांच्या नात्याबद्दल विविध चर्चा सुरू आहेत. आता काही मीडिया रिपोर्ट्समध्ये दावा करण्यात आला आहे की, ५ जुलै रोजी आमिर आणि गौरी रजिस्टर पद्धतीने लग्न करू शकतात. मात्र, या वृत्ताला अद्याप आमिर खान किंवा त्याच्या टीमकडून अधिकृत दुजोरा मिळालेला नाही. रिपोर्ट्सनुसार, हे लग्न अत्यंत साधेपणाने आणि खासगी पद्धतीने पार पडण्याची शक्यता आहे. मुंबईतील आमिर खानच्या घरीच रजिस्टर मॅरेज होऊ शकते, अशी चर्चा आहे. या सोहळ्यात केवळ दोन्ही कुटुंबातील सदस्य, जवळचे नातेवाईक आणि काही निवडक मित्र उपस्थित राहतील, असेही सांगितले जात आहे. मीडिया रिपोर्ट्समध्ये असा दावाही करण्यात आला आहे की, या लग्नासाठी सुमारे १०० ते १५० पाहुण्यांना निमंत्रण देण्यात आले आहे. आमिर आणि गौरी यांनी काही जवळच्या मित्रांना आणि नातेवाईकांना स्वतः भेटून आमंत्रित केल्याचेही बोलले जात आहे. विशेष म्हणजे, बॉलिवूडमधील मोठ्या सेलिब्रिटींना या सोहळ्याचे निमंत्रण दिले जाणार नसल्याचीही चर्चा रंगली आहे. त्यामुळे हा विवाह पूर्णपणे कौटुंबिक आणि खाजगी स्वरूपाचा असण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.



# गोल्डन साडीत मिथिलाची जादू

अभिनेत्री मिथिला पालकर पुन्हा एकदा तिच्या स्टायलिश आणि मोहक लूकमुळे चर्चेत आली आहे. सोशल मीडियावर नेहमीच सक्रिय असणाऱ्या मिथिलाने नुकतेच तिच्या इन्स्टाग्राम अकाऊंटवर काही नवीन फोटो शेअर केले आहेत. या फोटोंमध्ये ती गोल्डन रंगाच्या साडीत अतिशय सुंदर आणि आकर्षक दिसत आहे. तिच्या या पारंपरिक आणि ग्लॅमरस लूकने चाहत्यांची मनं जिंकली असून, पोस्ट सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. मिथिलाने शेअर केलेल्या फोटोंमध्ये तिने गोल्डन रंगाची आकर्षक साडी परिधान केली आहे. त्यासोबत तिने साधे पण उठावदार दागिने आणि हलका मेकअप केला आहे. तिच्या चेहऱ्यावरील आत्मविश्वासपूर्ण स्मित आणि वेगवेगळ्या स्टायलिश पोझमुळे हे फोटो आणखी खास वाटत आहेत. चाहत्यांनी तिच्या या लूकचे भरभरून कौतुक केले असून, पोस्टवर काही तासांतच लाखो लाईक्स आणि हजारो प्रतिक्रिया आल्या आहेत. हे फोटो शेअर करताना मिथिलाने नेटफ्लिक्ससोबत खास पोस्ट केली आहे. यामागचे कारण म्हणजे तिची नवीन वेब सीरिज 'सुपर सुब्बू' प्रदर्शित झाली आहे. या पोस्टमध्ये तिने चाहत्यांना ही वेब सीरिज पाहण्याचे आवाहन करत, "आज नेटफ्लिक्सवर भेटूया, 'सुपर सुब्बू' आज प्रदर्शित झाली आहे," असा संदेश दिला आहे. 'सुपर सुब्बू' ही मूळ तेलुगू भाषेतील वेब सीरिज असून ती हिंदी, तमिळ, कन्नड आणि मल्याळम भाषांमध्येही उपलब्ध आहे. या मालिकेत मिथिला पालकरसोबत संदीप किशन, मलिक राम आणि मुरली शर्मा यांसारखे कलाकार महत्त्वाच्या भूमिकांमध्ये दिसत आहेत. वेगवेगळ्या भाषांमध्ये प्रदर्शित झाल्यामुळे या मालिकेबाबत प्रेक्षकांमध्ये उत्सुकता निर्माण झाली आहे. मिथिला पालकरने गेल्या काही वर्षांत अनेक चित्रपट आणि वेब सीरिजमधून आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. नैसर्गिक अभिनय, साधेपणा आणि स्क्रीनवरील सहज वावर यामुळे ती प्रेक्षकांची आवडती अभिनेत्री बनली आहे. तिच्या प्रत्येक नव्या प्रोजेक्टची चाहत्यांना उत्सुकता असते.सध्या ३३ वर्षीय मिथिला पालकर सोशल मीडियावरही प्रचंड लोकप्रिय आहे. इन्स्टाग्रामवर तिचे जवळपास ३.९ दशलक्ष फॉलोअर्स आहेत. ती नियमितपणे तिच्या कामाशी संबंधित अपडेट्स, फोटोशूट आणि वैयक्तिक आयुष्यातील काही खास क्षण चाहत्यांसोबत शेअर करत असते. तिच्या प्रत्येक पोस्टला चाहत्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असतो.

# वैभव-अभिषेक देणार सलामी!

## सॅमसनला डच्चू, अव्वल फळीत तीन डावखुरे फलंदाज ठरू शकतात डोकेदुखी

महाईन्यूज । नवी दिल्ली

**भारत आणि इंग्लंड यांच्यातील पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेतील दुसरा थरार मँचेस्टर येथील ऐतिहासिक ओल्ड ट्रॅफर्ड स्टेडियमवर रंगणार आहे. या मालिकेतील पहिला सामना पावसाच्या व्यत्ययामुळे रद्द झाला होता, त्यामुळे आता मालिकेचा निकाल लागण्यासाठी केवळ चारच सामने शिल्लक राहिले आहेत.**



या पार्श्वभूमीवर, युवा फलंदाज वैभव सूर्यवंशीला आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पणाची संधी मिळणार का, हाच सर्वात मोठा प्रश्न सध्या उपस्थित केला जात आहे. जर संघ व्यवस्थापनाने वैभवला संधी देण्याचा निर्णय घेतला, तर सध्या खराब फॉर्मशी झगडत असलेल्या संजू सॅमसनला अंतिम अकरा (प्लेइंग ११) मधून बाहेर बसावे लागू शकते.

तथापि, टी-२० विश्वचषकात 'प्लेअर ऑफ द टुर्नामेंट' ठरलेल्या संजू सॅमसनला संघ व्यवस्थापन इतक्या लवकर संघातून वगळणार का, हे पाहणे उत्सुकतेचे ठरेल. परंतु, जर वैभव सूर्यवंशीचा संघात समावेश करायचा असेल, तर संजू सॅमसनलाच विश्रांती द्यावी लागेल, हे आता स्पष्ट झाले आहे. वैभव हा प्रामुख्याने सलामीवीर फलंदाज आहे आणि दुसऱ्या बाजूला अभिषेक शर्मा सध्या उत्कृष्ट फॉर्ममध्ये आहे. भारतीय क्रिकेट जगतातील अनेक दिग्गज खेळाडू सध्या वैभव सूर्यवंशीला लवकरात लवकर पदार्पणाची संधी देण्याची मागणी करत आहेत. सलामीच्या स्थानाचा अपवाद वगळता, मँचेस्टरमधील दुसऱ्या सामन्यासाठी भारतीय संघ रचनेत मोठे बदल होण्याची शक्यता धूसर आहे.

### अव्वल फळीत तीन डावखुरे फलंदाज ठरू शकतात डोकेदुखी

जर संजू सॅमसनच्या जागी वैभव सूर्यवंशीला संघात स्थान दिले, तर भारताच्या अव्वल फळीतील (टॉप ३) तिन्ही फलंदाज हे डावखुरे असतील. ही रणनीती भारतीय संघासाठी उलट उलटण्याची (बॅकफायर होण्याची) शक्यता आहे. इंग्लंड संघात विल जॅक्स, लियाम डॉसन आणि आदिल रशीद यांसारखे दर्जेदार फिरकीपटू आहेत, जे डावखुऱ्या फलंदाजांवर वर्चस्व गाजवू शकतात. अशा परिस्थितीत, सांघिक संतुलन आणि योग्य समीकरणाचा विचार करता वैभव सूर्यवंशीला पदार्पणासाठी आणखी काही काळ वाट पाहावी लागू शकते.

### भारत पुन्हा तीन फिरकीपटूंसह उतरणार?

मालिकेतील पहिल्या टी-२० सामन्यात भारतीय संघ अक्षर पटेल, वरुण चक्रवर्ती आणि रवी बिश्नोई अशा तीन फिरकीपटूंसह मैदानात उतरला होता. मँचेस्टरमध्येही हीच रणनीती कायम ठेवणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. ओल्ड ट्रॅफर्डच्या खेळपट्टीवर मधल्या षटकांमध्ये फिरकीपटूंना काही प्रमाणात मदत मिळते, परंतु येथील खेळपट्टी प्रामुख्याने वेगवान गोलंदाजांसाठी अधिक अनुकूल मानली जाते.

# 2026 फिफा वर्ल्ड कपनंतर रोनाल्डो निवृत्त होणार?

महाईन्यूज । नवी दिल्ली

**पोर्तुगालचा दिग्गज फुटबॉलपटू क्रिस्टियानो रोनाल्डो याच्या आंतरराष्ट्रीय कारकिर्दीचा शेवट लवकर होणार असल्याची चर्चा पुन्हा एकदा रंगली आहे. रोनाल्डोची बहीण कातिया अवेइरो हिने 2026 चा फिफा विश्वचषक हा रोनाल्डोचा अखेरचा असू शकतो, असे संकेत दिले आहेत. तिने या स्पर्धेला त्याचा "लास्ट डान्स" असे संबोधले आहे. मात्र, रोनाल्डोकडून किंवा पोर्तुगाल फुटबॉल संघाकडून याबाबत अद्याप कोणतीही अधिकृत घोषणा करण्यात आलेली नाही.**



एका वृत्तवाहिनीशी बोलताना कातिया अवेइरो म्हणाली, "माझ्या माहितीनुसार, आता चाहत्यांनी रोनाल्डोला निरोप देण्याची तयारी ठेवावी. 2026 चा विश्वचषक हा त्याचा शेवटचा असू शकतो." या वक्तव्यानंतर रोनाल्डोच्या निवृत्तीबाबतच्या चर्चांना वेग आला आहे.

क्रोएशियाविरुद्ध झालेल्या विश्वचषकाच्या बाद फेरीतील सामन्यात रोनाल्डोने पेनल्टीवर गोल करत पोर्तुगालला 2-1 असा विजय मिळवून दिला. या गोलासह 41 वर्षे 147 दिवसांच्या वयात विश्वचषकाच्या नॉकआउट सामन्यात गोल करणारा सर्वात वयस्कर खेळाडू होण्याचा विक्रम त्याने आपल्या नावावर केला. याआधीचा विक्रम लिओनेल मेस्सीच्या नावावर होता. विशेष म्हणजे, सहा विश्वचषक खेळूनही हा रोनाल्डोचा पहिलाच नॉकआउट फेरीतील गोल ठरला.

क्रोएशियाविरुद्ध मैदानात उतरताच रोनाल्डोने आणखी एक विक्रम केला. विश्वचषकाच्या नॉकआउट सामन्यात खेळणारा सर्वात वयस्कर आउटफिल्ड खेळाडू म्हणून त्याची नोंद झाली. या सामन्यात क्रोएशियाचा अनुभवी खेळाडू लुका मॉड्रिच देखील खेळत होता. विश्वचषकाच्या इतिहासात प्रथमच दोन्ही संघांकडून 40 वर्षांपेक्षा जास्त वयाचे आउटफिल्ड खेळाडू एकाच सामन्यात मैदानात उतरले.

स्पर्धेच्या सुरुवातीला रोनाल्डोची कामगिरी अपेक्षेप्रमाणे झाली नव्हती. डीआर कॉंगोविरुद्ध तो एकही शॉट मारू शकला नव्हता. त्यामुळे त्याच्यावर टीका झाली होती. मात्र त्यानंतर त्याने उज्बेकिस्तानविरुद्ध दोन गोल झळकावले आणि क्रोएशियाविरुद्ध निर्णायक गोल करून टीकाकारांना उत्तर दिले.

### आंतरराष्ट्रीय कारकिर्दीतील विक्रम

रोनाल्डोने आतापर्यंत पोर्तुगालसाठी 232 आंतरराष्ट्रीय सामने खेळले असून 146 गोल केले आहेत. पुरुषांच्या आंतरराष्ट्रीय फुटबॉलमध्ये सर्वाधिक गोल करणारा खेळाडू म्हणून त्याच्या नावावर विक्रम आहे. जर कातिया अवेइरो यांचा दावा खरा ठरला, तर 2026 च्या फिफा विश्वचषकानंतर फुटबॉल इतिहासातील एका महान आंतरराष्ट्रीय कारकिर्दीचा शेवट होईल. मात्र तोपर्यंत रोनाल्डो आणखी किती विक्रम आपल्या नावावर करतो, याकडे जगभरातील फुटबॉलप्रेमींचे लक्ष लागले आहे.

स्मार्ट PCMC
SMART CITY
epaper.mahaenews.com
महाईन्यूज ™
ePaper
। शनिवार ।
दि. 04 जुलै 2026 ।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# महापालिका शाळांतील १,२८० विद्यार्थी पाठ्यपुस्तकांविना!

**महाईन्यूज ।**
**पिंपरी- चिंचवड**

पिंपरी-चिंचवड महापालिका व आकांक्षा फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने चालविण्यात येणाऱ्या इंग्रजी माध्यमाच्या शाळांमधील सुमारे १,२८० विद्यार्थ्यांना शाळा सुरू होऊन १५ दिवसांहून अधिक कालावधी उलटूनही पाठ्यपुस्तके मिळालेली नाहीत. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर परिणाम होत असून, तातडीने पाठ्यपुस्तकांचा पुरवठा करावा आणि या विलंबास जबाबदार असलेल्या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नगरसेवक संदीप वाघेरे यांनी महापालिका आयुक्तांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

महापालिका आणि आकांक्षा फाउंडेशन यांच्या सहकार्याने २०१३ पासून कै. अनुसया नामदेव वाघेरे इंग्लिश मीडियम स्कूल, कै. दत्तोबा रामचंद्र काळे इंग्लिश मीडियम स्कूल आणि पी.सी.एम.सी. बोपखेल इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये इयत्ता पहिली ते आठवीपर्यंत विद्यार्थ्यांना मोफत व गुणवत्तापूर्ण शिक्षण दिले जाते. या शाळांनी सातत्याने उत्कृष्ट शैक्षणिक कामगिरी करत दहावीचा शंभर टक्के निकाल कायम राखला आहे.

मात्र, मागील दोन वर्षांपासून वेळेत मागणी करूनही पाठ्यपुस्तकांचा पुरवठा होत नसल्याची बाब समोर आली आहे. यंदाही शाळा सुरू होऊन १५ दिवसांहून अधिक कालावधी लोटला असतानाही विद्यार्थ्यांना पुस्तके मिळालेली नसल्याने अध्यापनावर परिणाम होत आहे.

याबाबत संदीप वाघेरे यांनी प्रशासनाचे लक्ष वेधत, गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे हा या शाळांचा उद्देश असताना पाठ्यपुस्तके वेळेत न मिळणे ही गंभीर बाब असल्याचे म्हटले आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताशी कोणतीही तडजोड स्वीकारली जाणार नसून, प्रशासनाने तातडीने पुस्तके उपलब्ध करून या प्रकरणातील जबाबदारांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

## दोन वर्षांपासून तोच प्रश्न

मागील दोन वर्षांपासून वेळेत मागणी करूनही महापालिकेच्या इंग्रजी माध्यम शाळांना पाठ्यपुस्तकांचा पुरवठा वेळेवर होत नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. यंदाही १५ दिवस उलटूनही पुस्तके न मिळाल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याची खंत व्यक्त करण्यात आली.







# पवना बंद जलवाहिनीला सकारात्मक प्रतिसाद

## मावळच्या शेतकऱ्यांना सोबत घेऊन 'पवना जलवाहिनी' पूर्ण होणार- शंकर जगताप

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**औद्योगिक नगरीच्या भविष्यासाठी वरदान ठरणाऱ्या आणि जल सुरक्षेची हमी देणाऱ्या 'पवना बंद जलवाहिनी' प्रकल्पाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. आमदार शंकर जगताप यांनी पिंपरी-चिंचवडच्या पुढील ३० वर्षांच्या पाण्याचे नियोजन आणि वाढत्या लोकसंख्येचा प्रश्न अत्यंत प्रभावीपणे मांडल्याने या रखडलेल्या प्रकल्पाला आता मोठी गती मिळणार आहे. शेतकऱ्यांचे पुनर्वसन आणि त्यांच्या प्रलंबित मागण्या या सर्वांचा सकारात्मक आढावा घेऊनच पुढील निर्णय घेतला जाईल.**




यासाठी लवकरच एक उच्चस्तरीय बैठक देखील आयोजित करण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले आहे.मावळच्या शेतकऱ्यांना सोबत घेऊनच 'पवना जलवाहिनी' पूर्ण होणार असल्याचे आमदार शंकर जगताप यांनी यावेळी सांगितले.

विधानभवन, मंत्रीमंडळ सभागृह मुंबई येथे शुक्रवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या अत्यंत महत्त्वाच्या बैठकीस जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, खासदार श्रीरंग बारणे, विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, आमदार महेश लांडगे, आमदार उमा खापरे, आमदार अमित गोरखे, आमदार सुनील शेळके आणि माजी आमदार बाळा भेगडे तसेच पिंपरी-चिंचवडचे महापौर रवि लांडगे, उपमहापौर शर्मिला बाबर, स्थायी समितीचे सभापती अभिषेक बारणे, सभागृह नेते प्रशांत शितोळे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर आणि भाजपा शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांच्यासह पुणे विभागीय आयुक्त, पिंपरी-चिंचवड महापालिका आयुक्त, पुणे जिल्हाधिकारी, जलसंपदा विभागाचे मुख्य अभियंता आणि नगरविकास, महसूल, रेल्वे, एमएसआरडीसी, महावितरण, पीएमआरडीए व महापालिकेचे वरिष्ठ अधिकारी या बैठकीला उपस्थित होते. आमदार शंकर जगताप यांच्या या यशस्वी पाठपुराव्यामुळे पिंपरी-चिंचवडच्या पाणीप्रश्नाला कायमची गती मिळण्याची चिन्हे निर्माण झाली आहेत. या बैठकीमुळे पवना बंद जलवाहिनी प्रकल्पाच्या अंमलबजावणीला नवी दिशा मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. आमदार शंकर जगताप यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे पिंपरी-चिंचवडच्या दीर्घकालीन पाणीप्रश्नाच्या समाधानाचा मार्ग अधिक सुकर होत असल्याचे चित्र आहे. आता प्रस्तावित उच्चस्तरीय बैठकीनंतर प्रकल्पाला प्रत्यक्ष गती मिळेल, अशी आशा पिंपरी-चिंचवडकरांनी व्यक्त केली आहे.

> 'पवना बंद जलवाहिनी' प्रकल्प हा पिंपरी-चिंचवडच्या जल सुरक्षेसाठी वरदान ठरणार आहे आणि याला आदरणीय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सकारात्मक प्रतिसाद दिल्याबद्दल मी त्यांचा मनापासून आभारी आहे. पिंपरी-चिंचवडकरांना आणि विशेषतः मावळमधील माझ्या शेतकरी बांधवांना, भूमिपुत्रांना आश्वस्त करू इच्छितो की, हा प्रकल्प पुढे नेताना मावळच्या शेतकऱ्यांवर कोणत्याही प्रकारचा अन्याय होऊ दिला जाणार नाही. त्यांच्या प्रलंबित मागण्या आणि पुनर्वसनाचा प्रश्न सोडवण्याला आमचे सर्वोच्च प्राधान्य असेल. मावळ आणि पिंपरी-चिंचवड या दोन्ही भागांना समान न्याय मिळाला पाहिजे, हीच आमची भूमिका आहे. म्हणूनच, मावळमधील सर्व संस्था, संघटना आणि शेतकरी प्रतिनिधींना सोबत घेऊन, त्यांच्याशी सन्मानपूर्वक चर्चा करूनच आगामी उच्चस्तरीय बैठकीत यावर कायमस्वरूपी व सर्वसमावेशक तोडगा काढला जाईल. शहराचा विकास करताना ग्रामीण भागातील शेतकर्यांचे हित जपणे हीच आमची संस्कृती आहे.
>
> **- शंकर जगताप, आमदार, चिंचवड विधानसभा मतदारसंघ.**

### मावळच्या शेतकऱ्यांना सोबत घेणार

हा प्रकल्प पूर्ण करताना मावळ मधील शेतकऱ्यांवर कोणत्याही प्रकारे अन्याय केला जाणार नाही, अशी ग्वाही देतानाच शेतकऱ्यांचे पुनर्वसन आणि त्यांच्या प्रलंबित मागण्या या सर्वांचा सकारात्मक आढावा घेऊनच पुढील निर्णय घेतला जाईल. यासाठी लवकरच एक उच्चस्तरीय बैठक देखील आयोजित करण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले आहे. मावळ आणि पिंपरी-चिंचवड या दोन्ही परिसराला समान न्याय मिळेल, याच भूमिकेतून आगामी काळात सर्व संस्था व संघटनांच्या प्रतिनिधींना विश्वासात घेऊन तोडगा काढण्यात येईल.असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

# पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतर्फे पालखी आगमनाची जय्यत तयारी

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या माध्यमातून पालखी मार्गाची आणि विविध विसावा ठिकाणांची महानगरपालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी आज प्रत्यक्ष पाहणी केली. भाविकांना कोणतीही गैरसोय होऊ नये आणि पालखी सोहळा अधिक शिस्तबद्ध व सुरळीत पार पडावा, या उद्देशाने आयुक्तांनी संबंधित विभागांना महत्त्वाच्या सूचना दिल्या आहेत.**



या पाहणी दौऱ्यावेळी अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, तृप्ती सांडभोर, विक्रांत बगाडे, उपायुक्त अण्णा बोदडे, मुख्य उद्यान अधीक्षक महेश गारगोटे,सहशहर अभियंता बापू गायकवाड,प्रभाग अधिकारी अतुल पाटील, निवेदिता घार्गे, कार्यकारी अभियंता शिवाजी चौरे, वैशाली ननावरे, कार्यकारी अभियंता विजय भोजने, उमेश मोने यांच्यासह महापालिकेचे विविध विभागप्रमुख व वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

सकाळी भक्ती-शक्ती चौकातून या पाहणीला सुरुवात झाली. यावेळी महापालिकेच्या वतीने उभारण्यात येणाऱ्या स्वागत कक्षाची पाहणी करून मेट्रोच्या कामामुळे येणाऱ्या अडचणी दूर करण्याचे निर्देश आयुक्तांनी दिले. त्यानंतर विठ्ठलवाडी येथील हनुमान मंदिर व विठ्ठल-रुक्मिणी मंदिर परिसरातील पालखी तळ, दर्शन रांग आणि मंडप व्यवस्थेचा आढावा घेण्यात आला. मार्गावरील अनधिकृत टपऱ्या आणि रस्त्यांवर येणाऱ्या लहान व्यावसायिकांमुळे भाविकांना अडथळा निर्माण होऊ नये, याची विशेष खबरदारी घेण्याचे आदेश आयुक्तांनी दिले आहेत.

दरम्यान पालखी विसावा ठिकाणाची पाहणी करताना आयुक्तांनी मेट्रो कामाचे लावलेले बॅरिकेड्स हटवण्यासोबतच प्रकाश व्यवस्था आणि वैद्यकीय सुविधा चोख ठेवण्याच्या सूचना दिल्या. पावसाळ्याचा विचार करता मैदानावर चिखल होऊ नये म्हणून तात्काळ खडी टाकण्याचे आणि शुद्ध पाणीपुरवठा सुनिश्चित करण्याचे निर्देशही त्यांनी दिले. यानंतर आकुर्डीतील खंडोबा चौकात मेट्रोच्या सुरू असलेल्या कामांमुळे पालखीला अडथळा येणार नाही याची खातरजमा करून, रस्त्यांची दुरुस्ती करणे आणि झाडांच्या फांद्या छाटणे आदी कामे तातडीने पूर्ण करण्याबाबत सूचित केले.

तसेच दापोडी येथील संत तुकाराम महाराज पालखी विसावा स्थळाची पाहणी करून आयुक्तांनी समाधान व्यक्त करत आवश्यक त्या सुधारणांचे आदेश दिले. पालखी सोहळा हा भाविकांच्या श्रद्धेचा विषय असल्याने, महापालिकेने आरोग्य, स्वच्छता, सुरक्षा या सर्व सुविधा वेळेत पूर्ण करण्यावर भर द्यावा, असे आयुक्तांनी स्पष्ट केले आहे.

# महापौरांकडून पालखी मार्गावरील सुविधांची पाहणी

## आषाढी पालखी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर मॅगझीन चौक व भक्ती शक्ती चौक येथील पालखी मार्गाची पाहणी

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**आषाढी एकादशीच्या निमित्ताने संतश्रेष्ठ श्री संत ज्ञानेश्वर महाराज व जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराज यांच्या पालखी सोहळ्यासाठी पिंपरी-चिंचवड शहरातून मोठ्या संख्येने वारकरी, भाविक आणि नागरिक मार्गस्थ होणार आहेत. या पार्श्वभूमीवर पालखी मार्गावरील सर्व नागरी सुविधा, स्वच्छता, वाहतूक, आरोग्य सेवा, आपत्ती व्यवस्थापन व सुरक्षा यंत्रणेच्या अद्ययावत ठेवून वारकरी बांधवांना आवश्यक त्या सोईसुविधा देण्यात याव्यात असे प्रतिपादन महापौर रवि लांडगे यांनी केले.**



“ पालखी सोहळा हा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक, आध्यात्मिक आणि सामाजिक परंपरेचा अमूल्य वारसा असल्याचे सांगत, वारकऱ्यांना कोणत्याही प्रकारची गैरसोय होणार नाही यासाठी सर्व विभागांनी परस्पर समन्वयाने व जबाबदारीने काम करण्याच्या सूचना दिल्या. वारकरी बांधवांच्या सुरक्षेसाठी टेहळणी टॉवर उभारावेत,पालखी मार्गावरील स्वच्छतेला सर्वोच्च प्राधान्य देण्याबरोबरच पिण्याचे पाणी, आरोग्य सेवा, वाहतूक नियंत्रण, आपत्कालीन सेवा आणि सुरक्षा व्यवस्थेमध्ये कोणतीही त्रुटी राहू नये. नागरिकांनीही प्रशासनाला सहकार्य करत स्वच्छता राखावी, वाहतुकीच्या सूचनांचे पालन करावे आणि पालखी सोहळा शांततापूर्ण व सुरक्षित वातावरणात पार पडण्यासाठी सहकार्य करावे.

**- रवि लांडगे, महापौर, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.**

पिंपरी-चिंचवड महापालिकेचे महापौर रवि लांडगे यांनी आज सकाळी मॅगझीन चौक व भक्ती शक्ती चौक,निगडी येथील पालखी मार्गाची पाहणी केली.

त्यांचे समवेत अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम,सह शहर अभियंता बापू गायकवाड ,उप आयुक्त अण्णा बोदडे, क्षेत्रीय अधिकारी अतुल पाटील,मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे,निवेदीता घार्गे, कार्यकारी अभियंता शिवाजी चौरे, दमयंती पवार,चंद्रकांत मुथाळ, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह महापालिकेच्या आरोग्य, स्वच्छता, पाणीपुरवठा, विद्युत, वाहतूक, आपत्ती व्यवस्थापन व इतर संबंधित विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

पाहणी दौऱ्याची सुरुवात सकाळी ८ वाजता मॅगझिन चौक येथून करण्यात आली. त्यानंतर भक्ती-शक्ती चौक येथे विविध विभागांनी केलेल्या कामांचा आढावा घेण्यात आला. यावेळी महापौरांनी पालखी मार्गावरील स्वच्छता, रस्त्यांची स्थिती, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, चलत शौचालये, आरोग्य पथके, रुग्णवाहिका, अग्निशमन यंत्रणा, वाहतूक नियोजन, प्रकाश व्यवस्था, दिशादर्शक फलक तसेच वारकऱ्यांसाठी उपलब्ध करून देण्यात आलेल्या विविध सोईसुविधांचा आढावा घेतला. महापौर रवि लांडगे यांनी संबंधित अधिकाऱ्यांकडून घेतली सुविधांची सविस्तर माहिती घेतली. तसेच, पालखी मार्गावरील सर्व सुविधा अखंडित सुरू ठेवून वारकऱ्यांच्या सूचना व अडचणींवर तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश संबंधित विभागांना देण्यात आले.

# पिंपरी चिंचवडचे शिवसैनिक उद्धव ठाकरे यांच्या सोबत

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या सहा खासदार आणि पुणे जिल्हा संपर्क प्रमुख सचिन आहेर यांनी शिवसेना शिंदे गटात प्रवेश केला आहे. परंतु पिंपरी चिंचवड शहरातील सर्व शिवसैनिक उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेसोबत आहेत असा विश्वास शहर प्रमुख चेतन पवार यांनी मातोश्री येथे दिला.

गुरुवारी (दि. २ जुलै) सकाळी चेतन पवार यांच्या नेतृत्वाखाली पिंपरी, चिंचवड, भोसरी विधानसभा मतदार संघातील प्रमुख पदाधिकाऱ्यांसह मुंबईत मातोश्री वर पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची भेट घेतली. यावेळी शेकडो शिवसैनिक आणि युवा सेनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी सर्वांनी उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करत पक्षाशी निष्ठा कायम असल्याचे सांगितले. त्यामुळे पिंपरी चिंचवड शहर शिवसेनेत फूट पडणार असल्याच्या अफवांना पूर्ण विराम मिळाला आहे. यावेळी प्रमुख पदाधिकारी आणि चेतन पवार यांनी उद्धव ठाकरे यांच्या समोर आपल्या भावना व्यक्त केल्या. सर्वांनी उद्धव आणि आदित्य ठाकरे यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करून पक्षावर निष्ठा कायम असल्याची हमी दिली. पिंपरी चिंचवड शहरातील एकही शिवसैनिक किंव्हा पदाधिकारी पक्ष सोडणार नसल्याचे आता स्पष्ट झाले आहे.

सध्याच्या राजकीय परिस्थितीत संघटनात्मक पातळीवर शाखा, बूथ स्तरावर जनसंपर्क वाढविणार आणि नव्या कार्यकर्त्यांना पक्षाशी जोडणार आहोत. शहर पातळीवर संघटना अधिक सक्षम करून पुढील काळात सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नासाठी वेळप्रसंगी रस्त्यावर उतरून आंदोलन करून जोमाने काम करण्याचा निर्धारही सर्वांनी व्यक्त केला असल्याचे चेतन पवार यांनी सांगितले आहे.

# स्मार्ट सिटीच्या नावाखाली नागरिकांच्या जीवाशी खेळ थांबवा; शिवसेना उपनेत्या सुलभा उबाळे

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिका हद्दीत पावसाळी कालावधीत खोदकामास बंदी असताना स्मार्ट सिटी कंपनीला तब्बल ३८ किलोमीटर खोदकामासाठी देण्यात आलेल्या विशेष परवानगीवर शिवसेना उपनेत्या तथा नगरसेविका सुलभा उबाळे यांनी तीव्र आक्षेप नोंदवला आहे.**



“ पावसाळ्यात खोदकामास बंदी असताना विशेष परवानगी देणे म्हणजे नागरिकांच्या जीविताशी थेट खेळ आहे. अशा खोदकामामुळे एखादी दुर्घटना घडल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी आयुक्त स्वतः घेणार आहेत का, तसे असेल तर त्यांनी माध्यमांसमोर येऊन याबाबत स्पष्ट भूमिका मांडावी. नागरिकांच्या सुरक्षिततेस प्राधान्य न देणारा ढिसाळ व बेफिकीर कारभार सहन केला जाणार नाही. त्यामुळे पिंपरी-चिंचवड महानगरपालिका प्रशासनाने हा धोकादायक निर्णय तत्काळ मागे घ्यावा, अन्यथा शिवसेना रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करेल.

**- सुलभा उबाळे, शिवसेना उपनेत्या, नगरसेविका, पिं. चिं. मनपा.**

यासंदर्भात त्यांनी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या आयुक्तांना सविस्तर पत्र देत प्रशासनाच्या निर्णयावर गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत.

महानगरपालिका हद्दीत दरवर्षी १५ मे ते १५ ऑक्टोबर या कालावधीत कोणत्याही प्रकारचे रस्ते खोदकाम करण्यास मनाई असते. मात्र या नियमाला डावलून स्मार्ट सिटी कंपनीसाठी विशेष परवानगी देण्यात आल्याचा आरोप उबाळे यांनी केला आहे. पावसाळ्यातील खोदकामामुळे नागरिकांच्या सुरक्षिततेला मोठा धोका निर्माण होतो, असे त्यांनी पत्रात नमूद केले आहे. उबाळे यांनी आपल्या पत्रात अलीकडील दुर्दैवी घटनांचाही उल्लेख केला आहे. पुणे महानगरपालिका हद्दीत प्रशासन व ठेकेदारांच्या निष्काळजीपणामुळे खोदलेल्या खड्ड्यात पडून दोन वर्षांच्या चिमुकल्याचा मृत्यू झाला. याचप्रमाणे मुंबईतही खड्ड्यांमुळे नागरिक गंभीर जखमी होणे व मृत्यू होण्याच्या घटना घडल्या आहेत. या पार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवडमध्ये अशीच घटना घडल्यास त्याची जबाबदारी कोण घेणार, असा थेट सवाल त्यांनी आयुक्तांना केला आहे. या पत्रामुळे शहरातील राजकीय वर्तुळात चर्चा रंगली असून, शिवसेनाकडून या मुद्द्यावर अधिक आक्रमक भूमिका घेतली जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# पवना थेट जलवाहिनीला मुख्यमंत्र्यांचा 'ग्रीन सिग्नल'

## आमदार महेश लांडगे यांच्या पाठपुराव्याला यश; तातडीने काम पूर्ण करण्याचे निर्देश

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड शहराच्या भविष्यातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी सोडविणाऱ्या महत्त्वाकांक्षी पवना धरण–निगडी जलशुद्धीकरण केंद्र थेट जलवाहिनी प्रकल्पाला अखेर निर्णायक गती मिळाली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली विधान भवन, मुंबई येथे झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत प्रकल्पातील प्रशासकीय, तांत्रिक, आर्थिक आणि कायदेशीर अडथळ्यांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. शेतकऱ्यांच्या न्याय मागण्या पूर्ण करण्यासाठी पुढील आठवड्यात शेतकरी व संघटनांचे प्रतिनिधी यांची बैठक होईल. त्यानंतर अंतिम निर्णय घेण्यात येईल, असे स्पष्ट निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत.**




> पवना थेट जलवाहिनी प्रकल्प हा केवळ पाणीपुरवठ्याचा प्रकल्प नसून पिंपरी-चिंचवडच्या लाखो नागरिकांच्या आरोग्याचा, भविष्यातील जलसुरक्षेचा आणि शहराच्या विकासाचा पाया आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या विषयाची गंभीर दखल घेत उच्चस्तरीय बैठक घेतली. शासनाच्या सकारात्मक भूमिकेमुळे प्रकल्पातील सर्व अडथळे दूर होऊन कामाला निश्चित गती मिळेल. मावळातील स्थानिक भूमिपुत्र, शेतकरी आणि लोकप्रतिनिधींना विश्वासात घेऊन, कोणाचेही नुकसान न होऊ देता पिंपरी-चिंचवडकरांना शुद्ध, सुरक्षित आणि पुरेसे पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. शेतकऱ्यांच्या सर्व न्याय्य मागण्या पूर्ण करण्यासाठीही प्रयत्न केले जातील.
>
> **- महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**

भाजपा आमदार महेश लांडगे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतर ही महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली. वाढती लोकसंख्या, पवना नदीतील वाढते प्रदूषण आणि भविष्यातील पिण्याच्या पाण्याची वाढती गरज लक्षात घेता या प्रकल्पाला राज्य शासनाने विशेष प्राधान्य देण्याचा निर्णय बैठकीत अधोरेखित करण्यात आला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीस जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, खासदार श्रीरंग बारणे, विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, आमदार महेश लांडगे, आमदार उमा खापरे, आमदार अमित गोरखे, आमदार शंकर जगताप, आमदार सुनील शेळके, माजी आमदार बाळा भेगडे, तसेच, पिंपरी-चिंचवडचे महापौर रवि लांडगे, उपमहापौर शर्मिला बाबर, स्थायी समितीचे सभापती अभिषेक बारणे, सभागृह नेते प्रशांत शितोळे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, भाजपा शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे, पुणे विभागीय आयुक्त, पिंपरी-चिंचवड महापालिका आयुक्त, पुणे जिल्हाधिकारी, जलसंपदा विभागाचे मुख्य अभियंता तसेच नगरविकास, जलसंपदा, महसूल, रेल्वे, एमएसआरडीसी, महावितरण, पीएमआरडीए आणि महापालिकेचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मावळातील शेतकरी, भूमिपूत्र आणि संबंधित संस्था संघटनांच्या प्रतिनिधींना घेवून पुढील आठवड्यात मुख्यमंत्री फडणवीस यांच्यासोबत बैठक होईल. या बैठकीत शेतकऱ्यांच्या मागण्या समजून घेवून त्यावर न्याय्य तोडगा काढण्यात येईल. याची जबाबदारी आमदार महेश लांडगे आणि आमदार सुनील शेळके यांच्याकडे सोपवण्यात आली आहे.

सन २००६ मध्ये केंद्र शासनाच्या जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियान (JNNURM) अंतर्गत मंजूर झालेल्या या प्रकल्पाचे काम २००८ मध्ये सुरू झाले होते. मात्र २०११ मधील आंदोलनानंतर प्रकल्प स्थगित झाला.

सप्टेंबर २०२३ मध्ये राज्य शासनाने 'जैसे थे' आदेश मागे घेतल्यानंतर प्रकल्प पुन्हा सुरू करण्याचा मार्ग मोकळा झाला. त्यानंतर सुधारित डीपीआर तयार करून आयआयटी मुंबईमार्फत तांत्रिक पडताळणी पूर्ण करण्यात आली. सुधारित डीपीआरनुसार प्रकल्पाची अंदाजित किंमत १,०१५.६४ कोटी रुपये असून, पूर्वी खरेदी केलेल्या जलवाहिन्यांचा पुनर्वापर केल्यामुळे महापालिकेचे सुमारे २०० कोटी रुपयांची बचत होणार आहे.

### शेतकऱ्यांच्या न्याय्य मागण्या मान्य करूनच प्रकल्प

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बैठकीत स्पष्ट शब्दांत सांगितले की, "हा प्रकल्प होणे गरजेचे आहे; अन्यथा भविष्य आपल्याला माफ करणार नाही. भावी पिढी आपल्याला करंटे म्हणेल." याचबरोबर त्यांनी आंदोलनात जखमी झालेल्या १२ शेतकऱ्यांना पिंपरी-चिंचवड महापालिकेत नोकरी देण्याची प्रक्रिया सुरू करण्याचे निर्देश दिले. बाधित शेतकऱ्यांच्या पुनर्वसनाचा प्रश्न प्राधान्याने सोडविणे, शेतकऱ्यांच्या न्याय्य मागण्या मान्य करणे, आमदार सुनील शेळके यांच्या उपस्थितीत शेतकरी व संघटनांच्या प्रतिनिधींसोबत स्वतंत्र बैठक घेणे, पिंपरी-चिंचवड महापालिका आणि राज्य शासनाने संयुक्तपणे प्रकल्प पूर्ण करणे तसेच पाणी पुनर्वापर (RECYCLE-REUSE) बंधनकारक करण्याबाबतही महत्त्वपूर्ण निर्देश दिले. मुख्यमंत्र्यांनी, "शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणार नाही. त्यांच्या न्याय्य मागण्यांबाबत शासन सकारात्मक आहे," अशी ग्वाही दिली.

# पाऊस सुरू... पण पवना धरण अजूनही कोरडेच! जलसाठा फक्त 16%

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**मावळ तालुक्यातील पवना धरण परिसर तसेच, पिंपरी-चिंचवड शहरात पावसाची दिवसभर संततधार सुरू आहे. मात्र, पवना धरणात पाणी साठ्यात वाढ झाली नसल्याने चिंता कायम आहे. गेल्यावर्षी धरणात तब्बल 63 टक्के पाणीसाठा होता. मात्र, सध्या केवळ 16 टक्के जलसाठा आहे. त्यामुळे जोरदार पावसाची अपेक्षा केली जात आहे.**



पिंपरी-चिंचवड शहरासह एमआयडीसह काही नगरपालिका व ग्रामपंचायत यांना पवना धरणातून पाणी पुरवले जाते. यंदा पाऊस लांबल्याने धरणातील पाणी साठा 16 टक्क्यांवर आला आहे. जलसंपदा विभागाने 20 जूनपासून 15 टक्के पाणी कपात लागू केली आहे. तेव्हापासून महापालिकेकडून शहरात तास ते दीड तासाने कमी पाणी दिले जात आहे. त्यामुळे शहरातील अनेक भागांना पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे.

दरम्यान, दोन ते तीन दिवसांपासून शहरासह मावळ तालुका परिसरात पावसाची संततधार सुरू आहे. मात्र, पावसाचा दमदार जोर नसल्याने धरण क्षेत्रात पाणी साठा होत नसल्याचे चित्र आहे. गेल्या 24 तासात धरण परिसरात 30 मिलीमीटर पावसाळची नोंद झाली आहे. आत्तापर्यंत एकूण 199 मिलीमीटर पाऊस झाला आहे.

पवना धरणात गुरूवारी (दि.2) दुपारी चारपर्यंत 16.96 टक्के पाणी साठा होता. गेल्या वर्षी याच दिवशी धरणात तब्बल 62.91 टक्के जलसाठा होता. त्यामुळे मावळ तालुक्यासह शहरात दमदार पावसाची प्रतीक्षा शेतकऱ्यांसह शहरवासीयांना लागली आहे.